# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/05/2023 (मंगळवार) सायंकाळ


---

## पो.स्टे. अरोली हद्दीमधील निमखेडा येथील क्रिकेट सट्टयावर धाड

## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक ०८/०५/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीण हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन अरोली हद्दीत निमखेडा गावात वार्ड नं. ०३ येथे काही इसम हे एका घरात IPL मधील पंजाब विरूद्ध कलकत्ता यांचे मध्ये खेळल्या गेलेल्या क्रिकेट सामन्यावर बेटिंग (सट्टा) लावित असुन या प्रकारचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाले वरून सदर पथकाने निमखेडा गावात वार्ड नं. ०३ येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—१) रुपेश लक्ष्मण धांडे, वय ३१ वर्ष, प्लॉट नं. १३४, गोपालकृष्ण नगर, वाठोडा नागपूर** हा **आरोपी क्र. २) संतोष बागल, रा. वडसा गडचिरोली** यांच्या सांगणेवरून लोकांकडुन पैसे घेवुन IPL मधील पंजाब विरूद्ध कलकत्ता यांचे मध्ये खेळल्या गेलेल्या क्रिकेट सामन्यावर बेटिंग (सट्टा) लावण्यावर रेड केली असता आरोपी रुपेश लक्ष्मण धांडे, वय ३१ वर्ष, प्लॉट नं. १३४, गोपालकृष्ण नगर, वाठोडा नागपूर हा क्रिकेट सामन्यावर सट्टा घेत असतांना समक्ष मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन १) ४ मोबाईल संच किंमती अंदाजे २२,०००/— रुपये २) एक TV २०००/—रुपये ३) नगदी ५०००/— रुपये असा एकूण २९,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपींतांना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे अरोली यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली परी. पोलीस अधिक्षक अनिल म्हस्के, परी. पोलीस उपअधीक्षक राहुल झालटे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार राजेंद्र रेवतकर, पोलीस नायक आशीष मुंगळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, सतिश राठोड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.



## घरफोडी

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा धापेवाडा शिवार, पोतदार यांचे शेतातील बंगला येथे दिनांक ०७/०५/२०२३ चे २३.३० वा. ते ०८/०५/२०२३ चे १२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुग्रीव त्रिलोकी उईके, वय ५२ वर्षे, रा. मरकवाडा, ता. अमरवाडा, जि. छिंदवाडा (म.प्र) ह. मू. धापेवाडा शिवार, पोतदार यांचे शेतातील बंगला, ता. कळमेश्वर हे शेतातून काम करून रात्री त्यांचे मालकाचे घरी रखवाली करीता गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने शेतातील बंगल्याचे कुलूप तोडून बंगल्याचे आत प्रवेश करून १) २ नग इन्वर्टर बॅटरी जुनी किंमती अंदाजे ३६०००/— रू. २) १ नग तांब्याचा नळ व कॉक किंमती अंदाजे ७०००/— रू. ३) ७ नग स्टिलचे नळ व २ स्टिल कॉक एकुण किमती ११,०००/— रू. असा एकुण ५४,०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१६७८ धनंजय भूक्ते मो. नं. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

# चोरी

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील एस. टी. बस स्टॉप येथे दिनांक ०७/०५/२०२३ चे १३/०० वा. ते १३/१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. मंजुषा दिनेश बाळापुरे, वय ३० वर्ष, रा. नांदागोमुख ता. सावनेर ही तिचे बहीणीचे गावी जाण्याकरीता बस स्टॉप सावनेर येथे आली असता हिने आपल्या गळयातील ८ ग्रॅम वजनी असलेले सोन्याचे मंगळसुत्र किंमती अंदाजे १०,०००/– रू. ची गळयातुन काढुन मोठया पर्स मधील लहान पर्समध्ये ठेवली नंतर बस मधे तिकीट करीता पर्स मधुन पैसे काढत असता फिर्यादी हिला तिचे सोन्याचे मंगळसुत्र दिसुन आले नाही पर्स बाबत बस मधील लोकांना विचारपुस केली व बस मध्ये शोधले असता लहान पर्स कोठेही मिळुन आली नाही फिर्यादी ही बस मध्ये चढत असतांना गर्दीमध्ये कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे मोठी पर्सची चैन उघडुन सोन्याचे मंगळसुत्र ८ ग्रॅम वजनी किंमती अंदाजे १०,०००/– रू. चे ठेवलेले लहान पर्स काढुन चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास प्रकाश ठोके ब. नं. १००१ मो. नं. ८२०८९०१२१९ हे करीत आहे

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**